शनिवार दि.१५ जून २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २८७
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

# कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आश्वासन देऊन देखील मागण्या पूर्ण नाही

## तालुक्यातील अधिकारी झोपलेत का ?; शेडनेटची नुकसान भरपाई न मिळाल्यामुळे शेतकरी करणार आत्मदहन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । प्रतिनिधी**

बुलढाणा जिल्ह्यामध्ये वादळी पावसासह गारपीट मोठ्या प्रमाणात झाल्याने शेतकऱ्याचे अतोनात नुकसान व शेडनेटचे शंभर टक्के नुकसान होऊन शेतकऱ्याला न्याय मिळावा याकरीता बालाजी सोसे यांनी १८ मागण्या केल्या होत्या सिंदखेड राजा तहसील कार्यालयासमोर सहा दिवस आणि पळसखेड चक्का येथे चार दिवस अन्नत्याग आमरण उपोषण केले, सोसे यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्याकरिता सर्व राजकीय पक्षातील नेतेमंडळींनी संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सिंदखेडराजा तहसील समोर लोकांनी १४ डिसेंबर रोजी रस्तारोको केले श्री गजानन जायभाये यांनी गोंधनखेड तालुका देऊळगाव राजा येथे पिक विमा संदर्भामध्ये तीन दिवस अन्नत्याग आमरण उपोषण केले त्यावेळी उपजिल्हाधिकारी जिल्हा कृषी अधीक्षक माननीय तहसीलदार साहेब तालुका कृषी अधिकारी व जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांनी त्यांच्या उपोषण स्थळाला भेट दिली आणि श्री बालाजी सोसे यांचे पहिलं उपोषण सोडण्याचे आश्वासन कृषी मंत्री श्री धनंजय मुंडे यांनी फोन करून मदत देण्याचे आश्वासन दिले होते. डॉक्टर राजेंद्रजी शिंगणे साहेब यांनी सुद्धा उपोषण सोडते वेळेस आश्वासने दिली दुसरे उपोषण माननीय जिल्हा अधिकारी कार्यालय यांच्या मध्यस्थीने तहसीलदार सिंदखेड राजा तालुका कृषी अधिकारी साहेब, यांनी लेखी आश्वासन दिल्याने श्री बालाजी सोसे यांनी उपोषण सोडले



श्री गजानन जायभाये यांनी कपाशी पिक विमा संदर्भामध्ये शेतकऱ्याकडून नजरचुकीने स्टँडिंग क्रॉप ऐवजी हार्वेस्टिंग क्रॉप ऑनलाईन मध्ये नजरचुकीने चूक झाल्याने शेतकऱ्याचे अर्ज नाकारण्यात आले त्याकरिता व बागायती क्षेत्राची मदत मिळावी यासाठी व पिक विमा संदर्भामध्ये नाकारण्यात आलेल्या शेतकऱ्यांना सरसकट पिक विमा देण्यात यावा याकरिता दोघांनी सुद्धा उपोषण करून लेखी आश्वासन देऊन सुद्धा आज पर्यंत कुठली मदत न मिळाल्याने दिनांक १८/ ६/ २०२४ रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय सिंदखेड राजा येथे आत्मदहनाचा इशारा लेखी स्वरूपात दिला आहे त्यामध्ये आम्हाला जर अटक केल्यास आम्ही अटक त्या क्षणापासून अन्नत्याग आमरण उपोषण पुन्हा सुरू करू असे त्यामध्ये उल्लेख करण्यात आला आहे .त्यामुळे आता प्रशासन याकडे कशा पद्धतीने यांचे आंदोलन हाताळणार आहे व या भूमिकेकडे सर्वच शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. या अगोदरच्या उपोषणाला हजारोच्या संख्येने शेतकऱ्यांनी व संपूर्ण राजकीय नेते मंडळींनी पाठिंबा दिला .त्यामुळे आता हे आंदोलन कशा पद्धतीने पुढे जात आहे याकडे संपूर्ण जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# पत्रकार अविनाश कदम यांना महाराष्ट्र स्वाभिमान गौरव राज्यस्तरीय पुरस्कार जाहिर

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । राजू म्हस्के**

आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दै.लोकमत, मराठवाडा साथी वृत्तपत्रांचे तालुका प्रतिनिधी अविनाश कदम हे मागील गेल्या १५ वर्ष पत्रकारिता क्षेत्रांमध्ये कार्यरत असून अनेक सामाजिक व गोरगरीब सर्वसामान्यांच्या, विविध घटकांतील प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम व न्याय मिळवून देण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून करत असून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल मुंबई येथील जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक व कवी महासंघाच्या वतीने आयोजित शिवराज्याभिषेकाच्या गौरवशाली दिनानिमित्त महाराष्ट्र स्वाभिमान गौरव राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर झाल्याची माहिती अध्यक्ष प्रकाश जाधव व सचिव सुरज भोईर यांनी दिली.



मुंबई येथील जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक व कवी महासंघाच्या वतीने शिवराज्याभिषेकाच्या गौरवशाली दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देण्यात येत असतात. या वर्षीचा २०२४ चा उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार अविनाश कदम यांना जाहिर झाला असून लवकरच दि.२३ जून २०२४ रोजी मुंबई पत्रकार संघ येथील पत्रकार भवन आझाद मैदानाजवळ येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तर अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार असून त्यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे. मुंबई येथील जय महाराष्ट्र पत्रकार वृत्तपत्र लेखक व कवी महासंघाच्या वतीने धार्मिक, सामाजिक, साहित्य,कला, क्रीडा, पत्रकारित, कृषी व शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना महाराष्ट्र स्वाभिमान गौरव राज्यस्तरीय उत्कृष्ट पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.यंदाचा पत्रकारितेचा पुरस्कार आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दै.लोकमत व मराठवाडा साथी वृत्तपत्रांचे तालुका प्रतिनिधी अविनाश कदम यांना जाहिर झाला असून ते मागील पंधरा वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात असून राजकीय, सामाजिक शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, कला, क्रीडा, धार्मिक विविध क्षेत्रातील मान्यवरांना प्रकाश झोतात आणण्याचे काम ते मागील पंधरा वर्षापासून करत असून त्यांनी गोरगरीब सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्याचे काम केले आहे. पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार अविनाश कदम यांना जाहीर झाल्याबद्दल त्यांचे विविध क्षेत्रातील मान्यवर स्वागत करत असून व सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# सचिन मेघडंबर यांच्या वाढदिवसा निमित्त वंचित बहुजन आघाडीचे रक्तदान शिबीर संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडीचे मा.महासचिव सचिन मेघडंबर यांच्या वाढदिवसा निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते या रक्तदान शिबिराला युवकांसह पत्रकार सामाजिक कार्यकर्ते सर्वांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला या कार्यक्रमाला वंचित बहुजन आघाडीचे धनगर समाजाचे नेते विष्णू देवकते बीड तालुकाध्यक्ष किरण वाघमारे पाथरी तालुक्याचे महासचिव अशोक नरवडे साहेब माजलगाव तालुक्याचे महासचिव समाधान गायकवाड तर शिवशंभू चॅरिटेबल ट्रस्टचे



जिल्हाध्यक्ष लखन वीर, पाटोदा तालुकाध्यक्ष अनिकेत जावळे या वेळी उपस्थित होते. या रक्तदान शिबिराला पाटोदा तालुक्यातील युवकांनी चांगला प्रतिसाद दिला शिवशंभु चॅरीटेबल ट्रस्ट व वंचित बहुजन आघाडी पाटोदा यांच्या संयुक्त विद्यामान हा कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी सचिन मेघडंबर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना रक्तदान कसे श्रेष्ठ आहे हे सांगितले. या वेळी कार्यक्रमाला सामाजिक, राजकीय, पत्रकार विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. तसेच वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष गोरख झेंड, तालुकाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, दिपक थोरात, सुनील जावळे, अनिकेत वाघमारे, अक्षय वाघमारे सह इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जालिंदर यादव सर यांनी केले तर आभार नितीन इंकर यांनी मानले.

## आज अनेक संत महंत व मान्यवर यांच्या उपस्थितीत

# श्री क्षेत्र संतकृपा हनुमानगड सावरगांव (घाट) येथे ज्ञानदर्शन गुरुकुल चा भव्य उद्घाटन सोहळा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आज दि.१५.०६.२०२४ रोजी संतकृपा हनुमानगड सावरगांव (घाट) येथे ज्ञानदर्शन गुरुकुल चे संत महंत व विविध मान्यवर यांच्या हस्ते भव्य उद्घाटन होणार आहे अनाथ व ऊसतोड कामगारांच्या मुलांना मोफत प्रवेश देण्यात येत आहे आज या ज्ञानदर्शन गुरुकुल चे उद्घाटन शुभहस्ते ह.भ.प बुवासाहेब महाराज खाडे,ह.भ.प.स्वामी त्रिविक्रमानंद शास्त्रीजी(गणेशानंदगड), मा. संतोष खाडे साहेब (ऊध्दझ) ह.भ.प.आजिनाथ महाराज शास्त्री (तारकेश्वरगड) ह.भ.प. सुदर्शन महाराज खाडे (पाटणसांगवी) ह.भ.प.रघुनाथ महाराज (धामणगावकर), ह.भ.प. महादेवानंद म.शास्त्री (अश्वलिंग संस्थान),ह.भ.प. राधाताई म.आईसाहेब (महासांगवी) ह.भ.प.गहिनीनाथ म. खेडकर (घो.पारगाव) ह.भ.प. सतिष म.उरणकर (वि.रू.सं.पाटोदा) ह.भ.प. रोहीदास म.शास्त्री (राजेधर्माजीगड),श्री. बाळासाहेब सानप साहेब (जय भगवान महासंघ म.राज्य) श्री.नारायण म.डिसले,श्री.दिपक देवा (डोंगरकीन्ही) यांच्या शुभहस्ते व यांच्या प्रमुख उपस्थिती मा.पंकजाताई मुंडे (राष्ट्रीय सरचिटणीस,भाजपा) मा.ना.धनंजय मुंडे साहेब (कृषीमंत्री म.राज्य) मा.सुरेश (आण्णा) धस,मा.भीमरावजी धोंडे साहेब,मा.बाळासाहेब आजबे काका,मा.श्री.ओमराजे निंबाळकर,मा.ड सिताराम चव्हाण,मा.राजे पवार (रक्षक अकॅडमी),मा.रमेश आजबे (जामखेड),मा.विजयकुमार गोल्हार,मा.ड रमेश सोनवणे,मा.वारंगुळे साहेब,मा. छगनरावजी खटके साहेब (भिवंडी),मा.सुभाष शेकडे सर (महिंदा),मा.ड.महेंद्र गर्जे,मा. अविनाश वाघ साहेब,मा.एम.पाटील (पंढपुर),मा.ड खेडकर साहेब (संभाजनगर)मा.अशोक वाघमोडे सर (जेऊर),मा. अरुणजी सांगळे,मा.भाऊसाहेब (आण्णा) भवर,मा.देविचंदजी डोगरे,मा.माऊली (आप्पा) जरांगे (जि.प.सदस्य),मा.सतिष (आबा) शिंदे,मा.सुवर्णाताई लांबरुड,मा.डॉ.राजेंद्र सानप यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन सोहळा संपन्न होणार आहे तरी या सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन श्री.ह.भ.प.महंत अभिमन्यू महाराज शास्त्री ( अध्यक्ष ज्ञान दर्शन गुरुकुल श्री क्षेत्र संतकृपा हनुमान गड ) सावरगाव (घाट) यांनी केले आहे.

# काठीने जबर मारहाण करून २१ वर्षीय तरुणाची हत्या;रक्ताने माखलेला होता २१ वर्षीय तरुण

## तीन तासात लावला पोलिसांनी आरोपीचा शोध

लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**

तालुक्यातील मौजे धरणगांव येथे काठीने जबर मारहाण करून २१ वर्षीय युवकाची हत्या करण्यात आली असल्याची घटना आज शुक्रवारी सकाळी उघडकीस आली.मृतक हा मोताळा तालुक्यातील डिडोळ्या येथील रहिवासी असून पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले होतो या हत्येचा शोध घेण्यासाठी श्वान पथकाला सुद्धा पाचारण करण्यात आले होते. या घटनेतील एक आरोपी निष्पन्न झाला असून दोन संशयित आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे.

या घटनेबाबत अधिक माहिती अशी की , आज शुक्रवारी सकाळी ५ ३० वाजेच्या सुमारास तालुक्यातील मौजे धरणगांव येथील काही जण शौचास जात असतांना गावातील खंडोबा मंदिरानजीक असलेल्या सार्वजनिक ओपन सभागृहात त्यांना रक्ताचा सडा आढळून आला.त्यांनी तत्काळ पोलीस पाटलांच्या माध्यमातून शहर पोलिसांना माहिती दिली. त्या अनुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी देवराम गवळी यांच्या पथकासह सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर गुट्टे,सहाय्यक पोलीस निरीक्षक करुणाशिल तायडे , सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्वर वर्गे, पोलीस उपनिरीक्षक राहुल वरारकर,यांच्यासह पोलीस कर्मचारी ना.पो.कॉ

शाम कपले, पोलीस अंमलदार आसिफ शेख,ईश्वर वाघ,प्रमोद राठोड,प्रवीण गवई,संतोष कुमावत,गोपाल इंगळे,मंगेश चरखे, अशोक सुरळकर, नवल राठोड,निलेश तायडे,सचिन पवार,गोपाल खंडारे, आर्दीसह पोलिस पथक घटनास्थळी दाखल



झाले.त्यांना खंडोबा मंदिरानजीकच्या ओपन सभागृहात रक्ताचा सडा व बाजूला युवकाचा मृतदेह आढळून आला.मृतकाच्या खिशातील मोबाईलवर संपर्क करण्यात आल्याने त्याची ओळख पटली. मृतकाचे नाव दिपक सुधाकर सोनोने वय २१ रा . डिडोळा ता . मोताळा असे आहे. या घटनेत मृतकावर काठीने जबर मारहाण केल्याचे समोर आले आहे. त्याचबरोबर खंडोबा मंदिरानजीकच्या ओपन सभागृहात उत्तरेकडून दक्षिणेकडे तब्बल ३० फूट मारेकऱ्यांनी मृतदेह फरफटत नेल्याने रक्ताचा सडा पडल्याचे दिसून आले आहे. या घटनेत मोताळा तालुक्यातील डिडोळ्याच्या त्या युवकाची हत्या आपल्या गावात कशी..? या प्रश्नामुळे धरणगांवात एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी तीन तासाच्या आत ३ संशयित आरोपी ताब्यात घेऊन त्यातील १ आरोपी अनिल राजाराम इंगळे वय ४५ रा.धरणगाव याला निष्पन्न केले आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेताबुलढाणा येथील श्वान पथक घटनास्थळी पाचारण करण्यात आले होते. सदर कारवाई ही बुलढाणा पोलीस अधीक्षक सुनील कडासने व अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात उपविभागीय पोलीस अधिकारी देवराम गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून आरोपी त्यांच्याविरुद्ध कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील प्राथमिक तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक करुणाशील तायडे करीत असून सदर घटना ही दारू पिण्याच्या वादातून झाली असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# परदेश शिक्षण शिष्यवृत्तीच्या जाचक अटी रद्द करा-ईंजि.अक्षय गोटेगावकर

लोकनेता न्यूज नेटवर्क

बीड । विजय रोडे

राजश्री शाहू महाराज परदेश शिक्षण शिष्यवृत्तीच्या जाचक अटी रद्द न केल्यास सम्यक विद्यार्थी आंदोलन राज्यभर आंदोलन करणार राज्यात आंबेडकरवादी विद्यार्थ्यांमध्ये रोष वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.खासदार अँड.बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर यांच्या सामाजिक न्यायाच्या लढाईतील विद्यार्थी चळवळ सम्यक विद्यार्थी आंदोलन महाराष्ट्र राज्य, सल्लागार समिती प्रा. अंजलीताई प्रकाश आंबेडकर, प्रदेशाध्यक्ष महेश भारतीय सर, डॉ.अरुण सावंत सर, युवा नेते सुजातभाई आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली ईंजि. अक्षय गोटेगावकर, (कृषि अभियंता) निरिक्षक, सम्यक विद्यार्थी आंदोलन पुणे, महाराष्ट्र

राज्य, तथा ज्ञानमाता माहिती अधिकार प्रशिक्षण केंद्र अंतर्गत माहिती अधिकार कार्यकर्ते नागरिक समुह पुणे ( प्रचार व प्रसार यंत्रणा ) महाराष्ट्र शासनाकडून राबवली जाणारी राजर्षी छत्रपती शाहू महाराज परदेश शिष्यवृत्ती योजना पारदर्शी, लोकाभिमुख व केरळ राज्य सरकारच्या परदेश शिक्षण शिष्यवृत्तीच्या डजझ नुसार जाचक अटी रद्द करून अंमलात आणण्यासाठी योग्य आदेश देण्यात येण्याकामी/ अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र स्वरूपाचे विद्यार्थ्यांचे खतरनाक आंदोलन. शासनाकडून राबवली जाणारी शाहू महाराज परदेश शिक्षण शिष्यवृत्ती योजना प्रभावीपनणे राबवण्यात राज्य शासन, प्रशासन सपशेल नापास झाले? आहे हे आपणास मान्य करावेच लागेल. कारण अनेक विद्यापीठांनी विद्यार्थ्यांनी फॉर्म भरावे असे असे सांगून त्या तारखेची मर्यादा संपेपर्यंत आपल्या सामाजिक अन्याय करणाऱ्या राज्य शासन आणि प्रशासनाकडून कुठल्याही हालचाली होताना दिसत नाहीत. परिणामी परदेश शिक्षण शिष्यवृत्तीच्या अर्जकर्त्या विद्यार्थी व पालकांचे नुकसान होऊन वर्ष वाया जाते, आपल्या नाकर्ते पणामुळे पालक कर्जबाजारी होतो. (त्याने आत्महत्या केल्यास आपणास गुन्हेगार म्हणून गृहीत धरावे का?) यास पूर्णपणे आपल्यापैकी सर्वच जण, (मा. मुख्य सचिव महोदयांपसून ते शेवटचे कारकून यांच्या पर्यंत सर्व ) कारणीभूत आहात !

जगभरातील सर्वोत्तम विद्यापीठांपैकी स्वतःहुन त्यांच्याकडून पुरविल्या जाणाऱ्या शिक्षण सुविधा, सेवा, सवलती आणि आपली त्याबाबतची आपल्या राज्य शासन व प्रशासन यांची अनभिज्ञता यात फार मोठी तफावत व प्रचंड मोठी उदासीनता आढळते आहे. ती तफावत, उदासीनता दूर करायची असल्याने त्यासाठी एक समिती त्या समितीमध्ये मी आमच्या दोन विद्यार्थी , प्रतिनिधी, सदस्य नेमवून जगभारतील विविध विद्यापीठांची माहिती, समिती सदस्यांना त्या विद्यापीठांमध्ये पाठवून त्यांच्याकडून



स्वतःहुन पुरविले जाणाऱ्या शिक्षणसेवा, सवलती यांची माहिती घेऊन ती सरकारला पुरविणे ती अंमलात आणली जाण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न होणे गरजेचे आहे व त्यासाठी विद्यार्थी, जगभरातील सर्वोत्तम १०० विद्यापीठांमधली किती विद्यापीठ कोणत्या देशात आहेत त्यासाठी फक्त कागदावर नाहीतर ऑन ग्राउंड प्रयत्न होणे फार गरजेचे आहे. आपल्या यादीमध्ये आणखी विद्यापीठांचा आकडा वाढण्याची गरज आहे. देशातील आयआयटी सारख्या सर्वोच्च व नामवंत शिक्षण संस्थेत शिकून ही एका सर्व्हेक्षण संस्थेच्या नोंदीनुसार ३८% विद्यार्थी बेरोजगारच असल्याचे निदर्शनास आल्याने राज्यातील मागास व इतर प्रवर्गातील विद्यार्थी व जागरूक पालकांचा कल परदेशातील, आशियायी देशातील विद्यापीठाकडे अधिक असतो, तो उगाच नव्हे! त्यामागे ऑक्सफर्ड, , एम आय टी, स्टॅनफर्ड, हार्वर्ड, मेलबर्न, केंब्रिजसह युरोपातील विद्यापीठांना शेकडो वर्षांची परंपरा आहे. मुख्य म्हणजे प्रयत्नपूर्वक राखलेली सर्वोत्तम गुणवत्ता यांच्या वारसा आहे. आपला विद्यार्थी इथपर्यंत पोहचवण्यात प्रशासन आणि राज्य सरकार प्रचंड उदासीन आहे. केवळ उच्च दर्जाच्या शिक्षणानेच देशाची आर्थिक व सामाजिक परिस्थिती बदलू शकते, असे म्हणणाऱ्या असे म्हणणाऱ्या आपले बाप, भारताचे राज्यघटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या ऐतिहासिक वाक्याला आपण चॅलेंज करत आहात की काय?असा प्रश्न विद्यार्थी व पालक वर्गाला पडलेला आहे.

प्रमुख मागण्या व सुचना पुढील प्रमाणे परदेश शिक्षण शिष्यवृत्तीच्या जाचक अटी शिथिल करण्यात याव्यात जसे की उत्पन्न मर्यादा ही वार्षिक १६ लाख रुपये पर्यंत व वयाची अट किमान ४५ वर्षे पर्यंत वाढवण्यात यावी. विद्यार्थी अर्जांची मर्यादा ७५ किमान १५० करावी व त्यातील ७५ जागा या सीरर्वीरींळेप साठी सर्व बोर्ड(-+, इ+ अजून जे बोर्ड शासन मान्य असतील ते सर्व बोर्डाच्या विदयार्थी )साठी खुल्या कराव्यात.८०% ची अट रद्द करून ती कमीत कमी ६०% करावी, कारण ग्रामीण भागातील विद्यार्थी ऊस तोडून, शेत मजुरीचे काम,कष्ट करून शिक्षण घेत असतात त्यांना त्यांना कमीच मार्क असतात. ८०% ची अट रद्द करून ती किमान ६० % न केल्यास आपण ग्रामीण भागातील, शेत मजुरांच्या मुलांचे प्रवेशाची जागा जास्त शहरी मुलांना मिळेल म्हणजे तुम्ही संवेदनशील आहात ग्रामीण मजुरांच्या मुलांवर जाणीवपूर्वक अन्याय करताय? व शहरी, अधिकारी यांच्या मुलांना प्राधान्य देताय असे सिद्ध होईल. त्यामुळे मार्क्स ची मर्यादा कमीत कमी ६०% करावी.जागतिक विद्यापीठे, कॉलेजेस यांची आपण घातलेली २०० वी रँक ची मर्यादा ३०० रँक असलेल्या सर्व विद्यापिठे, कॉलेजेस अर्ज भरण्यासाठी वाढवून आपल्या यादीत समाविष्ट करावीत.परदेश शिक्षण शिष्यवृत्तीच्या फॉर्म भरायला प्रत्येक वर्षी फेब्रुवारी पासून सुरू ठेवून सप्टेंभर पर्यंत तारीख वाढव्यात कारण वेगवेगळ्या विद्यापीठाचे फॉर्म व्यवस्थापन हि त्यांचेच असल्याने आपल्या विद्यार्थ्यांना सोईस्कर होईल असे फॉर्म भरावे, या प्रोसेस मध्ये फॉर्म सोडण्यासाठी उशीर आणि बंद करण्यासाठी घाई करू नये. (शासकीय पैसे शिष्यावृत्तीचे आहेत ते आपल्या कुणाच्याही घरच्या तिजोरीतून जाणार नाहीत.)विद्यापीठांचे ऑफर जोईनिंग लेटर आल्यास पात्र विद्यार्थ्यास विमान प्रवासाचे पैसे त्वरित त्याच्या खात्यावर तारखेच्या १५ दिवस अगोदरच जमा करावे.एक समिती स्थापित करून त्या समितीमध्ये मी आमच्या दोन विद्यार्थी , प्रतिनिधी, सदस्य नेमवून जगभारतील विविध विद्यापीठांची माहिती, समिती सदस्यांना त्या विद्यापीठांमध्ये पाठवून त्यांच्याकडून स्वतःहुन पुरविले जाणाऱ्या शिक्षणसेवा, सवलती यांची माहिती घेऊन ती सरकारला पुरविणे ती अंमलात आणली जाण्यासाठी युद्धपातळीवर, पारदर्शीपणाने प्रयत्न होणे गरजेचे आहे. समाज कल्याण आयुक्त कार्यालय पुणे व विभागीय आयुक्त यांच्या कार्यालय स्थरावरून सदर परदेश शिक्षण शिष्यवृत्तीच्या जनजागृतीसाठी सर्व कर्मचारी शक्य होईल तशी मदत केंद्रे उभारणे गरजेचे, टीव्ही, रेडिओ आणि वृत्तपत्रे यावर विद्यार्थ्यांसाठी जाहिरात करणे गरजेचे, अर्जकर्त्या विद्यार्थी लोकांना अडीअडचणी येत असतात त्यात प्रशासनाची खूप टाळाटाळ मला दिसून आलेली आहे. (विद्यार्थ्यांनी फोन नंबर विचारल्यास त्याला कर्मचाऱ्यांनी स्वतःचा पर्सनल नंबर द्यावा, बंद पडलेला लागत नसलेला लांडलाईन नंबर नको. तुम्ही पगार उचलता तो जणतेसाठीच याची किती वेळा तुम्हाला जाणीव करून द्यावी, पुन्हा तसे माझ्या नजरेस आल्यास सम्यक विद्यार्थी आंदोलनाकडून तुमची कामे तुम्हाला योग्य रित्या शिकवण्यात, दाखवण्यात येतील) खएङ्ढड सारख्या चाचणी यांची फी गरीब मुलांना, विद्यार्थ्यांना अजिबात परवडण्याजोगी नाही, ती पूर्णपणे माफ करावा किंवा ती शासनाने भरावी. वा त्याचे फी चे पैसे आगाऊ रक्कम शिष्यवृत्तीमध्ये वाढवून देण्यात यावी.माझ्यासारख्या ऊसतोड मजुरांच्या मुलांना ती १७ हजार परवडूच शकत नाही. परदेश शिक्षण संशोधन करणारे पूर्व विद्यार्थी यांच्याकडून काय काय अडीअडचणी येतात यावर त्यांच्याकडुन सूचना व उपाय योजना करायला हव्यात त्यासाठी सुचणा घेऊन त्यावर अंमल करणे गरजेचे आहे, ते करावे. केरळ राज्य सरकारने ज्या डजझ नुसार परदेश शिक्षण शिष्यवृत्तीच्या त्यातुलनेत महाराष्ट्र राज्य शासन व प्रसाशन फारच जाचक आणि किचकट अशी शिष्यवृत्तीची योजना जाणीवपूर्वक आखली आहे ?? असे वाटते. उपरोक्त मागण्या हे सम्यक विद्यार्थी आंदोलन महाराष्ट्र राज्य, अतिशय गांभीर्याने तळमळीने आणि तळागाळातील विद्यार्थ्यांच्या गरजेपोटी आपल्याकडे करत आहेत यावर अंमलबजाणी करण्यात आपल्या राज्य सरकार व प्रशासन यांनी कानाडोळा व नजर अंदाज करण्याचा प्रयत्न केला तर याची नोंद वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा.खासदार ऍड. बाळासाहेब तथा प्रकाशरावजी आंबेडकर साहेब यांच्याकडे होईल व मार्गदर्शक प्रा.अंजलीताई आंबेडकर, मा.महेशजी भारतीय सर व डॉ.अरुण सावंत सर यांच्या नेतृत्वात लोकशाही मार्गाने राज्यभर तीव्र स्वरूपाचे खतरनाक आंदोलन करण्यात येईल, अशा प्रकारचे निवेदने राज्यभर सम्यक विद्यार्थी आंदोलनाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यामार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले. असे प्रसिध्दी माध्यमांशी बोलताना सम्यक विद्यार्थी आंदोलन पुणे जिल्हा निरिक्षक तथा ज्ञानमाता माहिती अधिकार प्रशिक्षण केंद्र अंतर्गत माहिती अधिकार कार्यकर्ते नागरिक समुहाचे अक्षय गोटेगावकर यांनी सांगितले.

## पाउस आणि ती..

लोकनेता न्युज नेटवर्क



तुला पावसात भिजायला आवडते,
झालो मी पाऊसधार सखे.

कुठे कुठे अजूनही उन्हाळा,
पण तुझ्या दाराशी मुसळधार सखे.

इतके कसे वेड लावले या नभाला,
तुझ्या कडेच धाव आहे हळुवार सखे.

झिम झिम धारा,गार वारा,कोकीळ गाणी,
हे तुझ्या माझ्या प्रेमाचे साक्षीदार सखे.

ओलीचिंब होऊन तू घे मिठीत माझा ओलावा,
अन् ओसांडून वाहुदे असेच प्रेम समुद्रापार सखे.

आकाश नागरे

## आमदार दत्तात्रय भरणे लागले विधानसभेच्या तयारीला;सकाळी सातलाच मतदार संघात होणार दौरा

लोकनेता न्यूज नेटवर्क

इंदापूर । बबनराव धायतोंडे


लोकसभेच्या निवडणुकीनंतर आता सर्वांचे लक्ष लागले आहे ते उद्याच्या होणाऱ्या विधानसभेकडे,अवघ्या राज्यात प्रत्येक मतदार संघात फक्त विधानसभेचीच चर्चा आहे. पुण्याच्या इंदापूर मतदार संघात ही काही चित्र वेगळं नाही. पुन्हा २०२४ चं मैदान मारण्यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार दत्तात्रय भरणे पुढे सरसावले आहेत.



बारामती लोकसभेच्या निवडणुकीत सुनेत्रा पवारांचा पराभव झाल्यानंतर राष्ट्रवादीच्या सर्वच नेत्यांमध्ये,पदाधिकारी,आणि कार्यकर्त्यांमध्ये नाराजी होती.मात्र आता सुनेत्रा पवारांची राज्यसभेत लागलेल्या वर्णीने ही नाराजी दूर झाली आहे.पुन्हा एकदा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते आणि कार्यकर्ते विधानसभेच्या तयारीला लागले असून उद्या शनिवारी १५ जून रोजी आमदार दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीत इंदापुरात विविध बैठका पार पडणार आहेत.

दत्तात्रय भरणे सकाळी सात वाजताच इंदापूर शहरातील क्रीडा संकुलात आढावा बैठक घेणार आहेत.तर त्यानंतर सकाळी नऊ वाजता शासकीय विश्रामगृहात पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक घेऊन त्या संदर्भातील सूचना देणार आहेत.यासोबतच इंदापूर तालुक्यातील काही भाग दुष्काळाचा सामना करतोय त्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाईचा आढावाही आमदार भरणे घेणार आहेत.

## झाडे लावा झाडे जगवा



## बहू

लोकनेता न्युज नेटवर्क

बिहू हे आसामचे लोकनृत्य असून बिहू या सणाशी संबंधित नृत्य आहे.हे लोकनृत्य आसाममधील सर्व जाती धर्म-वर्ग यांची बंधने तोडून एकत्रितरित्या केले जाते.हे नृत्य अतिशय उत्साहपूर्ण ,जोशपूर्ण पद्धतीने तरुण स्त्री -पुरुषांकडून सादर केले जाते.चापल्यपूर्ण पदन्यास, हातांच्या वेगवान हालचाली आणि संगीताच्या तालावरील कमरेच्या हालचाली ही या नृत्यशैलीची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

या नृत्याची गीते ही आसाममधील नववर्षाच्या स्वागताच्या दरम्यान असणाऱ्या तेथील शेतकऱ्यांच्या दैनंदिन कामधंद्याशी संबंधित असतात.यासाठी ढोल,मोहोर सिंगोर पेपा(म्हशीच्या शिंगा पासून तयार केलेले वाद्य)झांज,गगना(बांबूपासून,वेळूपासून बनविलेली बासरी)टोका (बांबूपासून बनवलेली घंटा)ही वाद्ये वापरली वापरली जातात.

हे नृत्य वर्षातील तीन ऋतूत सादर केले जाते.

१.बोहाग
(एप्रिलमच्या मध्यामध्ये )
२.माघ
(जानेवारीच्या मध्यामध्ये )
३.काती
(ऑक्टोबरच्या मध्यामध्ये)



भारतीय लोकनृत्य

बोहाग बिहुला 'रंगाची बिहू' असेही म्हणतात.हे नववर्षाच्या सुरुवातीला पेरणीच्या वेळी केले जाते.तरुण मुलेमुली, स्त्रिया-पुरुष समूहाने हे नृत्य सादर करतात.

काती बिहुला ' कोंगाली बिहू'असेही म्हणतात.हे नृत्य पेरणीची कामे पूर्ण झाल्यानंतर केले जाते.यातून पिकांच्या वाढीमुळे झालेला आनंद साजरा केला जातो.पण हे नृत्य करण्यापूर्वी संध्याकाळी वाढीसाठी प्रार्थना केली जाते.माघ बिहुला 'भोगाली बिहू' असेही म्हणतात.पिकांच्या कापणी नंतर हे नृत्य केले जाते.भोगाली हा शब्द बोग या शब्दापासून निर्माण झाला आहे.याचा अर्थ खाणे किंवा खाऊन आनंद व्यक्त करणे.यावेळी स्त्रिया तांदळाचे केक आणि अन्य खाण्याचे पदार्थ करतात आणि त्याचा आनंद घे रात्रभर हे नृत्य करतात.

वेशभूषा:

क्रीम कलरची लाल काठ असणारी साडी नेसतात .ही साडी कोटा सिल्कची असते.त्यावर दोऱ्याची एम्ब्रॉयडरी केलेली असते.पूर्ण किंवा अर्ध्या बाहीचे लाल रंगाचे ब्लाउज असते.केसांचा अंबाडा बांधून त्यामध्ये दोन काठ्या खोचलेल्या असतात .नृत्य करत असताना स्त्रिया या काठ्यांचा पिपाणीसारखा उपयोग करतात .मण्यांचे दागिने वापरले जातात.पुरुष गुढघ्यापर्यंत पांढरे धोतर नेसतात.अंगात सदरा आणि डोक्याला पांढऱ्या रंगाचे मुंडासे बांधतात.

रेणू जोशी (अभिनेत्री, नृत्यदिग्दर्शिका,लेखिका)

## जगणं तुझ्या हाती

लोकनेता न्युज नेटवर्क

वेळ कोणासाठी थांबत नाही ती पुढे सरकतेय तसं आपलं आयुष्यही.पृथ्वीतलावर अनेक जीव जन्माला आले पण, सगळ्यांत बुद्धीमान तर मनुष्य जात समजली जाते. मग या बुद्धीचा वापर कुठे,कधी व कसा करावा हे ज्याच्या त्याच्या हाती असते.प्रत्येकाच्या आयुष्यात चढउतार असतात कधी सुखाचे क्षण तर कधी दुःखाचा डोंगर उभा राहत असतो.योग्य विचार, प्रयत्न व संयम ठेवून योग्य मार्गाने चालत राहिले की मार्ग नक्कीच मिळतो. पण कधी कधी आपणच आपलं दुःख मोठं करतो मग ते हटत नाही तर त्याची तीव्रता वाढते अन आयुष्य मात्र छोटं होतं. कारण चिंता, त्रास, वेदना जतन करून दुःख हलकं होत नाही उलट जगण्यातील सुंदर व अनमोल क्षण गिळून बसतं जे परत कधीच येत नाहीत.त्याची भरपाई करण्याचा कोणताही मार्ग नाही.



रंजना सानप
मायणी (सातारा )
मा.नं-९०४९५४८३२३

असुया,द्वेष, तुलना, ईषा आणि आपल्या त्रासाला दुसऱ्याला जबाबदार धरणं या गोष्टीतच आयुष्यातला बराच वेळ वाया जातो.

मन, मेंदू. मनगटातील ताकद योग्य ठिकाणी लावणे राहून जाते.आपल्यातील प्रतिभा, छंद,आवडीनिवडी या गोष्टीकडे पुरेसे लक्ष देता येत नाही. ज्या गोष्टी आपल्याला माणूस म्हणून जगण्यासाठी खूप गरजेच्या असतात.

बघता बघता मग आयुष्याची संध्याकाळ येते. थोडं शहाणपण आलेलं असतं.राहून गेलेल्या गोष्टी, इच्छा, आकांक्षा जाग्या होतात. उगाच धडपड, चडपड, फडफड सुरु होते पण नियती मात्र आपलं काम सोडत नाही.

ती संकेत देते आता तुझी वेळ संपली रे. हात थरथरतात, डोळे धूसरतात, पाय लटपटतात, गात्र शितील होतात. उगाच निष्क्रिय बडबड,कडकड सुरु होते. जी आपल्या सभोवती वावरणाऱ्या प्रियजणांनाही आवडत नाही. पुढे तर श्वासाची गती मंदावते अन शरीर मातीशी एकरूप होऊन जातं.काही तासाच्या आठवणी नंतर त्याचं गाठोडं अडगळीला फेकलं जातं किंवा नको ती अडगळ कशाला? म्हणून विसर्जन करून मोकळे होतात.

एवढं क्षणभुंगूर आयुष्य असतानाही जगणंच विसरून जातोय आपण. पण खरं सांगू अजून वेळ गेलेली नाही. आतली मरगळ, दुःख, वेदना या क्षणाला झटकून टाकूयात. प्रत्येक क्षण आनंदात जगूयात. कधी निसर्गाला तर कधी आपल्या जवळच्या माणसांसोबत वेळ घालवूयात. कधी लहान होऊन उडया मारुयात, उनाड वाऱ्यासोबत भटकूयात.तर कधी मैत्रीचा हात देऊन मस्त जगूयात. जे चांगलं आहे ते ऐकूया, वाचूया, शिकूया याला मात्र वय लागत नाही पण तो विचार पक्क्या मनाची बांधणी करतो.मग ते मन कधीच डगमगत, अडखळत नाही. कधी एकांतात स्वतःचा शोध घेऊयात.

नको ते आनंदाने सोडूयात. कारण उगाच अपेक्षाचं ओझं घेऊन निघालात तर प्रवास करणं कठीण होऊन जाईल.हवं ते व्यक्तिमत्वाला साजेसं असं प्रयत्नाने मिळवूयात. कोणाचं दुःख हलकं करता आलं तर करूयात.माणूसकीचा हात देऊयात. फार काही नाही जमले तरी आपल्या त्रासाने कोणी दुःखी होणार नाही याची काळजी घेऊयात.

चला उठा मग लागा कामाला, आनंदाचे क्षण वेचायला.वेळ घड्याळयाच्या काट्याप्रमाणे पुढे सरकते आहे.पण मस्त जगणं मात्र ज्याच्या त्याच्याच हाती आहे.

## रक्तदान – मानवता धर्म

लोकनेता न्युज नेटवर्क

चौदा जून दिस । रक्तदान दिन ।
वाचवू या प्राण । गरजूंचे ।। १ ।।

लठ्ठपणा कमी । होणारच आहे ।
रक्तदान आहे । श्रेष्ठदान ।। २ ।।

प्रतिकार शक्ती । वृद्धिंगत होई
आनंदात न्हाई । रक्तदाते ।। ३ ।।

साधे रक्तदाता । स्वतःचेच हित ।
गुड कोलेस्ट्रॉल । वाढतसे।। ४ ।।


करू या प्रचार । करा रक्तदान ।
वाचवू या प्राण । रोग्यांचेच ।। ५ ।।

रक्तदान एक । मानवता धर्म । ।
करू हेचि कर्म । प्राणदान ।। ६ ।।

रक्तदान एक । थोर सेवा कार्य ।
हेचि श्रेष्ठ कार्य । जीवनात ।। ७ ।।

मानवाचे रक्त । अनमोल असे ।
जागृतीचे ठसे । उमटावे ।। ८।।



संत कबीर कविराज
राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
अभंगकार
प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले,
रुक्मिणी नगर,अमरावती

# कृषि विभागाने गावपातळीवर जावून उत्पादकता वाढीसाठी मार्गदर्शन करावे-ना.संजय बनसोडे

## शेतक-यांचे सर्व प्रश्न तातडीने सोडवा,कृषी विभागाचा अहवाल ७ दिवसाच्या आत देण्याचे आदेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**

उदगीर खरीप हंगाम शेतकरी बांधवांसाठी अतिशय महत्वाचा आहे. त्यामुळे खरीप पिकांच्या उत्पादकता वाढीसाठी, पिकांवरील कीड रोग नियंत्रणासाठी कृषि विभागाच्या अधिकाऱ्यांनी गावपातळीवर जावून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्या सूचना क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दिल्या. ते उदगीर येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजीत उदगीर विधानसभा क्षेत्रातील खरीप हंगाम आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी आर. टी. जाधव, कृषि विकास अधिकारी सुभाष चोले, उदगीरचे तहसीलदार राम बोरगावकर, जळकोटच्या तहसीलदार सुरेखा स्वामी, उदगीरचे गट विकास अधिकारी प्रवीण सुरडकर, जळकोटचे गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एम.एम. पाटील, कार्यकारी अभियंता सायस दराडे, उपविभागीय कृषी अधिकारी आर.एन. काळे, तालुका कृषी अधिकारी संजय नाबदे, जळकोटचे तालुका कृषी अधिकारी आकाश पवार, जिल्हा नियोजन समिती सदस्य श्याम डावळे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बालाजी भोसले, विधानसभा अध्यक्ष प्रवीण भोळे, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, पोलीस निरीक्षक अरविंद पवार, जळकोट बाजार समितीचे सभापती विठ्ठल चव्हाण, आदी उपस्थित होते.

यंदा मान्सूनच्या सुरुवातीलाच सर्वत्र चांगला पाऊस झाला आहे. त्यामुळे पेरणीला सुरूवात झाली असून शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे बियाणे आणि रासायनिक खते उपलब्ध होणे आवश्यक आहे. बियाणे, खतांचा तुटवडा निर्माण होवू नये, तसेच बोगस बियाणे, खते विक्री होवू नये, यासाठी प्रत्येक कृषि सेवा केंद्रांवर एका कृषि सहाय्यकाची नेमणूक करावी. याबाबतीत शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना मंत्री संजय बनसोडे यांनी दिल्या. तसेच उपलब्ध बियाणे, खतांची माहिती कृषि



सेवा केंद्रांवर प्रसिद्ध करण्याच्याही सूचना दिल्या. बीजप्रक्रिया, पेरणीची योग्य पद्धती, कीड रोग व्यवस्थापन याविषयी शेतकऱ्यांना माहिती द्यावी. विशेषतः सोयाबीन, तूर पिकांवरील कीड रोग नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी कृषि विभागाने गावोगावी शिबीर आयोजित करावे. त्यामुळे शंखी गोगलगाय, पिवळा मोजॅक आदीपासून पिकांचे रक्षण करणे शेतकऱ्यांना शक्य होईल. प्रधानमंत्री पीक विमा योजनेच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना सविस्तर माहिती देवून पिकांचे नुकसान झाल्यास कधी आणि कोणाला पूर्वकल्पना देणे बंधनकारक आहे, याविषयी मार्गदर्शन करावे, असे ना.संजय बनसोडे यावेळी म्हणाले.

वीज पडून मृत्यू झालेल्या उदगीर तालुक्यातील होणीहिप्परगा येथील बळीराम व्यंकट मुसळे यांच्या कुटुंबियांना ४ लाख रुपये सानुग्रह अनुदानाचे धनादेश ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. तसेच वीज पडून उदगीर तालुक्यातील ११ आणि जळकोट तालुक्यातील ५ जनावरे दगावली. संबंधित पशुपालकांनाही यावेळी प्रातिनिधिक स्वरुपात मदतीचे धनादेश देण्यात आले. शेतकऱ्यांना बियाणांचे वितरण; कृषि योजनांच्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन उदगीर तालुक्यातील २ हजार ७७५ शेतकऱ्यांना राष्ट्रीय खाद्यतेल गळीतधान्य अभियानातून अनुदानावर सोयाबीनचे बियाणे मंजूर झाले आहे. या बियाणांचे ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात वितरण करण्यात आले. तसेच कृषि विभागाच्या विविध योजनांवर आधारित माहिती पुस्तिकेचे प्रकाशनही यावेळी करण्यात आले. सन २०२१ चा कृषि भूषण पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल प्रगतशील शेतकरी श्याम सोनटक्के यांचा ना. बनसोडे यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला.

शंखी गोगलगाय प्रादुर्भाव नियंत्रणासाठी चित्ररथाद्वारे होणार जनजागृती

खरीप हंगामात शंखी गोगलगायमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यामुळे शंखी गोगलगायचे नियंत्रण करण्यासाठी शेतकऱ्यांनी योग्य उपायोजना करणे आवश्यक आहे. याबाबत माहिती देण्यासाठी कृषि विभागामार्फत चित्ररथाद्वारे गावोगावी जावून जनजागृती केली जाणार आहे. क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते चित्ररथाला हिरवी झेंडी दाखवून या मोहिमेला सुरुवात झाली.या आढावा बैठकीस उदगीर व जळकोट तालुक्यातील शेतकरी, व्यापारी, रासायनिक दुकानदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चिंचेवाडीला आत्महत्या ग्रस्थ वायभासे कुटुंबाची जय भगवान महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप यांची भेट

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा झालेला निसटता पराभव जिव्हारी लागल्याने मुंडे समर्थक एका तरूणाने गळफास घेऊन जिवन संपवल्याची घटना मंगळवारी रात्री बारा वाजेच्या दरम्यान घडली.पोपट वायभासे असे मृत तरूणाचे नाव होते.

आष्टी तालुक्यातील चिंचेवाडी येथील पोपट मधुकर वायभासे (३७) हा तरूण मुंडे समर्थक आहे.नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा पराभव जिव्हारी लागला.पराभव झाल्यापासून तो सारखा विचारात गेला होता. मंगळवारी रात्री त्याने कोणाला काही एक न बोलता चिंचेवाडी



शिवारात जाऊन एका झाडाला गळफास घेऊन जिवन संपवल्याची घटना घडली होती या कुटुंबाची जय भगवान महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप यांनी शुक्रवार दि.१४.०६.२०२४ रोजी सायंकाळी सहा वाजता भेट घेऊन सांत्वन करुन पुढील काळात काही अडचणी आल्यास सदैव तत्पर राहिल असे यावेळी कुटुंबाला सांगितले व तरुणांनी आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलु नये असे वायभासे कुटुंबाच्या सांत्वन भेटी दरम्यान बाळासाहेब सानप यांनी भावना व्यक्त केल्या


## हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते रविवारी इंदापूर येथे १० वी आणि १२ वी मधील गुणवंत विद्यार्थी आणि १०० % निकाल लागलेल्या शाळांचा सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

शहाजीराव पाटील विकास प्रतिष्ठान वनगळी, इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ इंदापूर व श्री.शिवाजी एज्युकेशन सोसायटी बावडा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १६ जून २०२४ रोजी इंदापूर येथील श्री.वाघ पॅलेस इंदापूर येथे दुपारी १ वाजता हर्षवर्धन पाटील अध्यक्ष, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ दिल्ली यांच्या हस्ते इयत्ता दहावी व बारावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि १०० % निकाल लागलेल्या शाळांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे.

पुणे जिल्हा भाजप युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा अंकिता पाटील - ठाकरे तसेच माजी शिक्षणाधिकारी साहित्यिक समुपदेशक अनिल गुंजाळ यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे.कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी,पालक, शिक्षक यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन शहाजीराव पाटील विकास प्रतिष्ठानच्या सचिव भाग्यश्री हर्षवर्धन पाटील,इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव ड.मनोहर चौधरी तसेच श्री.शिवाजी एज्युकेशन सोसायटीचे सचिव किरण पाटील यांनी केले आहे.




## लिंबागणेशकरांचावारंवार खंडित वीज पुरवठ्याचा प्रश्न सुटला;ट्रान्सफॉर्मर जळाला आणि २ तासातच नविन मिळाला-डॉ.ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

तालुक्यातील लिंबागणेश येथील बसस्थानक परिसरातील ट्रान्सफॉर्मरची फ्युज पेटीची विजेच्या साहित्य अभावी कित्येक दिवसांपासून दुरावस्था होती. तुटलेली फ्युज,जळालेली केबल,पेटीला सुरक्षा कवच नव्हते त्यामुळे वारंवार रात्री अपरात्री वीजपुरवठा खंडित झाल्याने ग्रामस्थांना अंधारात रात्र काढावी लागत असे त्यामुळे नविनच फ्युज पेटी बसविण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे, विक्रांत वाणी, हरिओम क्षीरसागर, कैलास गायकवाड, पांडुरंग वाणी, बशीर शेख,अभय वनवे यांनी उप अभियंता महावितरण कार्यालय लिंबागणेश विजय हुलकुडे यांना केली होती.त्यानंतर लगेचच मागणी मान्य करत नविन फ्युज पेटी बसविण्यात आली.त्यामुळे ग्रामस्थांनी सुटकेचा श्वास सोडला असुन वारंवार वीजपुरवठा खंडित होणार नाही व या परीसरातील दुध डेअरी मालक, बँक सुविधा फब्रीकेशन,दवाखाने व ईतर व्यावसायिक यांची अडचण काही प्रमाणात दुर होण्यास मदत होणार आहे.

ग्रामीण भागात ट्रान्सफॉर्मर जळाल्यानंतर ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. रात्र अंधारात काढावीच लागतो परंतु ईतर अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.महावितरणकडुन ट्रान्सफॉर्मर जळाला किंवा नादुरुस्त झाला तर ३ दिवसात बदलुन मिळेल म्हणत त्यासाठी स्थानिक मंडळ स्तरावरील कार्यकारी अभियंता व विभागाला



माहिती देण्यासाठी हेल्पलाईन क्रमांक ७८७५७६२००७ प्रसारित करण्यात आला असला तरी ३ दिवसात ट्रान्सफॉर्मर मिळेल याची खात्री देता येत नाही. मात्र लिंबागणेशकरांना याचा सुखद अनुभव आला असुन लिंबागणेश बसस्थानक येथील ट्रान्सफॉर्मर सायं ५ वाजता जळाल्याची माहिती डॉ.गणेश ढवळे, विक्रांत वाणी यांनी विजय हुलकुडे उप अभियंता महावितरण कार्यालय लिंबागणेश यांना दिल्यानंतर त्यांनी अवघ्या दोन तासात सायं ७ वाजता नविन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून दिला.आणि रात्री लगेचच नविन ट्रान्सफॉर्मर बसविण्यात आला यासाठी महावितरणचे कर्मचारी वैष्णव सुरवसे, युवराज सुरवसे तसेच अंकुश गायकवाड,तुकाराम गायकवाड व सहकाऱ्यांनी रात्रीतुन ट्रान्सफॉर्मर बसविला.याबद्दल उप अभियंता विजय हुलकुडे यांचे ग्रामस्थांनी आभार मानले.

## भाजपा कार्यकर्त्यांनो जन संपर्क वाढवा-हर्षवर्धन पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

सर्वसामान्य जनतेला नेहमी मदत करण्याची भूमिका ठेवा,त्यांच्या सुखदुखात सहभागी व्हा, नवीन मतदारांच्या नोंदणीकडे लक्ष द्या.तसेच सतत इतरांना मान-सन्मान द्या त्याचबरोबर भाजपा कार्यकर्त्यांनी जनतेशी असलेला संपर्क वाढवावा, असे आवाहन राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष, माजी मंत्री,भाजप नेते हर्षवर्धन



पाटील यांनी केले.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हर्षवर्धन पाटील यांनी भाजप कार्यकर्त्यांशी इंदापूर येथे संवाद साधला. देशामध्ये तिसऱ्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्वाखाली भाजपची मजबूत सत्ता आली आहे, त्याबद्दल यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी नरेंद्र मोदी सरकारचे अभिनंदन केले.

ते पुढे म्हणाले,प्रत्येक निवडणुकीला वेगळे संदर्भ असतात.मतदारांचा अभ्यास करा व मानसिकता लक्षात घ्या.लवकरच गावोगावच्या भाजप कार्यकर्त्यांशी संवाद साधणार असल्याचे यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.यावेळी इंदापूर तालुका भाजपचे अध्यक्ष अॅड.शरद जामदार यांनी प्रास्ताविक केले.तर आभार शहराध्यक्ष पांडुरंग शिंदे यांनी मानले.

## मायक्रो फायनान्स कंपनीकडून होत असलेल्या सक्तीच्या वसुली मुळे महिला हतबल

**निंगणूर । प्रतिनिधी**

सध्या रोज मंजुरी नाही शेतीचे कोणत्याही प्रकारचे कामे नसल्याने त्यामुळे हाताला कोणत्याही प्रकारची कामे नसून महिलांना मायक्रो फायनान्सचे कर्ज फेडण्यास अडचण जात आहे. सक्तीच्या वसुलीच्या दबावामुळे महिला जाम वैतागल्या असून शासनाने याबाबत उपाय योजना करावी, अशी मागणी महिलांकडून केल्या जात आहे. मागील तीन महिन्यापासून सर्व व्यवसाय उद्योगधंदे, रोजगार बंद आहेत. रोजगार उपलब्ध नसल्यामुळे ग्रामीण भागातील खासगी महिलांना मायक्रो फायनान्स कंपनीकडून घेतलेले कर्ज फेडणे अशक्य होतं आहे. आदिवासी बहुल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निंगनूर आणि परिसरात अनेक छोटे मोठे व्यवसाय, रोज मंजुरी करून कुटुंबांचा उदरनिर्वाह करणारे अनेक कुटुंब आहेत. सध्या पाऊस न आल्याने रोज मंजूर हतबल असल्याने सर्व व्यवहार ठप्प होऊन उत्पन्नाचे सर्व साधने बंद पडल्याने जगण्याचा प्रश्न निर्माण झाला. अशा परिस्थितीत मायक्रो फायनान्स कंपनीकडून कर्ज वसुलीसाठी सक्तीचे तगादा लावल्या जात आहे. शासनाकडून कर्ज वसुलीसाठी संदर्भात धोरण ठरवण्यात आले. वसुलीसाठी सक्ती करु नये, असे शासनाने स्पष्ट केले आहे.

## तालुका क्रीडा संकुलाच्या उभारणीसाठी १४ कोटी ८१ लक्ष रुपयाच्या अंदाजपत्रक व आराखड्यास शासनाची मान्यता-ना.संजय बनसोडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**

उदगीर शहरातील जिल्हा परिषदेच्या मैदानावर गेल्या अनेक दशकापासून तालुक्यातील खेळाडूंनी विविध प्रकारच्या खेळांचा सराव करुन राज्य व देश पातळीपर्यंत मजल मारली आहे. देशपातळीवर आपल्या उदगीर शहराचे नाव विविध क्रीडा प्रकारात या भागातील खेळाडूंनी गाजवले असुन आपल्या भागातील खेळाडुंना सर्व सुविधायुक्त मैदान उपलब्ध करून द्यावे म्हणून राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी उदगीर शहरातील जिल्हा परिषदेच्या मैदानावर तालुका क्रीडा संकुलाच्या उभारणीसाठी १४ कोटी ८१ लक्ष ४५ हजार रुपयाच्या अंदाजपत्रक व आराखड्यास शासनाची मान्यता देण्यात आली असुन आता क्रीडा संकुलाचे काम सुरु होणार असल्याची माहिती क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी दिली आहे.

उदगीर शहरातील जि.प. येथील सर्व्हे नं. ३०३/१ मधील १.८१ हे. आर अतिरिक्त व नविन जागा क्रीडा संकुल, उदगीर करिता उपलब्ध झाली होती. त्याठिकाणी फुटबॉल मैदान व इतर क्रीडा सुविधा उभारणीकरिता रु.९८९.६५ लक्षचे ढोबळ अंदाजपत्रक आराखड्यास यापूर्वी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती. तथापि, संकुल समितीने या नवीन ठिकाणी प्रस्तावित सुविधांसाठी सदर रू. ९८९. ६५ लक्षचे ढोबळ अंदाजपत्रकामध्ये वाढ करुन रु.१४८१.४५ लक्ष चे सुधारीत व सविस्तर अंदाजपत्रक सादर केले होते. त्यामध्ये प्रशासकीय इमारत, फुटबॉल मैदान, समपातळीकरण, अंतर्गत रस्ते, संरक्षण भिंत गेटसह, पाण्याची व्यवस्था, स्टेजवर्क, लॅन्डस्केपींग हार्वेस्टींग, व्हॉलीबॉल मैदान, जॉगींगट्रॅक, क्रीकेटपीच,




विद्युतीकरण आदी बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

मागील काळात उदगीर शहरातील याच तालुका क्रीडा संकुलावर मिनिस्टर ट्रॉफी डे - नाईट फुटबॉलचे सामने व स्व. खाशाबा जाधव यांच्या नावाने 'राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा' घेऊन उदगीर शहराचे नाव क्रीडा क्षेत्रामध्ये देशाच्या कानाकोपऱ्यामध्ये क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्या माध्यमातून नावारूपाला आले. आपल्या भागातील खेळाडू भविष्यात देश पातळीवर चमकावे यासाठी क्रीडामंत्री संजय बनसोडे हे सतत धडपडत असतात त्यांच्या प्रयत्नामुळेच तालुका क्रीडा संकुलाचा कायापालट होणार असून या क्रीडा संकुलामुळे येत्या काळात ग्रामीण भागातील खेळाडू हे देश पातळीवर नेतृत्व करून आपल्या उदगीर शहराचे नाव मोठे करतील असा विश्वास क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केला आहे.

क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी गेल्या वर्षभरात क्रीडा विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर राज्यातील खेळाडूंसाठी भरघोस निधीची तरतूद करून खेळाडूंना न्याय दिला. त्यासोबतच ग्रामीण भागातील खेळाडुंनी देशपातळीवर जावून आपल्या शहराचे नाव मोठे करावे म्हणून खेळाडुंना सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी जि.प. मैदानावर तालुका क्रीडा संकुलाची उभारणी पुणे येथील बालेवाडीच्या धर्तीवर करण्याचा निर्धार केला आहे. यामुळे आपल्या ग्रामीण भागातील खेळाडुंना मोठ्या शहराच्या बरोबरीने सुविधा उपलब्ध होणार असल्याने खेळाडु, प्रशिक्षक, पालक व क्रीडाप्रेमींनी क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले आहेत.

# भीक मागून उपजिविका करणाऱ्या व्यक्तींना अन्नदान करून वाढदिवस साजरा करणार-लाड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी शहरातील अंधत्वाने, दिव्यांगत्वाने,गरीबीने त्रासलेले, वेडसरपणाने त्रासलेले व्यक्ती भीक मागून आपली नियमित भटकंती करून शिळे - पाके मागून खाणारे,रुपया दोन रुपये मागून जगणारे व्यक्ती यांना राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक तथा दिव्यांग कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र लाड यांनी त्यांच्या आज दि.१५ जून २०२४ रोजी असलेल्या वाढदिवसानिमित्त दिवसभरात जेथे भेटतील तेथे त्यांना अन्नदान करून वाढदिवस साजरा करणार आहेत.या दिवशी राजेंद्र लाड हे कसलाही सत्कार,शाल,श्रीफळ, हार न स्विकारता गरीबांना व दिव्यांग बांधवांना अन्नदान करणार आहेत.

सामाजिक बांधिलकी जपणारे, सर्वधर्म समभावाची जपवणूक करणारे,सर्वांच्या सुख - दुखाःत मिसळणारे,सर्वांशीच मित्रत्वाची भावना ठेवणारे,मान - अपमानाने होरपळून न जाणारे,सततच इतरांना कौतुकाची थाप देणारे, स्पष्ट व बिनधास्त बोलणारे, कसलाही न्यूनगंड न बाळगणारे, शिक्षक नेते,दिव्यांग नेते,उत्कृष्ट संघटन कौशल्य,उत्कृष्ट सुत्रसंचलन,उत्कृष्ट वक्तृत्व, कर्तुत्व,दातृत्व,कुशल प्रशासक, विद्यार्थी प्रिय,दिव्यांग प्रिय, सततच शैक्षणिक,सामाजिक व राष्ट्रीय कार्यासाठी धडपडणारे शिक्षक २८ वर्षाची सेवा,कमी वयात तिनशेच्या वरती पुरस्कार, विविध शैक्षणिक व राष्ट्रीय विषयावर शंभरच्या वर लेख व दोनशे च्या वरती कविता लेखन करणारे,शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक व राष्ट्रीय कार्याची आवड असणारे,समाज प्रिय शिक्षक तसेच समाजाच्या भल्यासाठी असलेल्या अनेक योजनांची शासनाकडून जनजागृती केली जाते.यासाठी पोस्टर,बनर,वृत्तपत्र,नाटिका, दूरचित्रवाणी,इंटरनेट, व्हाँटसअप,फेसबुक अशा विविध माध्यमांचा वापर केला जातो. मात्र,ही जनजागृती केवळ शासनाचेच काम नाही,तर एक व्यक्ती म्हणून व आपणही समाजाचे



देणे लागतो,या भावनेतून अनेक योजनांचा प्रचार व प्रसार आपल्या दुचाकीवर बोर्ड लावून तर कधी कॉनर बैठकीतून करत असणारे,शाळेमध्ये विद्यार्थी घडविण्याबरोबरच समाज घडविण्याचेही काम करणारे,समाजाच्या भल्यासाठी असलेल्या अनेक योजनांविषयी सतत समाजजागृती करीत असणारे,स्वतः दिव्यांग असणारे, दिव्यांग व्यक्तींना येणाऱ्या अडीअडचणींची जाणीव असल्याने दिव्यांग क्षेत्रात राज्यभरातील दिव्यांगांना मार्गदर्शन करणारे,सर्वगुणसंपन्न व्यक्तीमत्व राजेंद्र लाड हे आहेत.राजेंद्र लाड यांना सन २०१६ साली बीड जि.प.चा व महाराष्ट्र शासनाचा जिल्हा व राज्य शिक्षक पुरस्कार एकाचवेळी मिळालेला असून आजपर्यंत त्यांनी दिव्यांग बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक उपक्रम राबवून त्यांना शासनाच्या सोयी - सवलती मिळवून देण्याचे काम केलेले आहे.ते स्वतःदिव्यांग असतांना देखील दिव्यांग संघटनेच्या माध्यमातून दिव्यांगांचा जनता दरबार आयोजित करून अधिकारी व पदाधिकारी यांना उपस्थित ठेवून अनेक प्रश्न निकाली काढलेले आहेत.दिव्यांगत्वावर मात करून सदृढ शिक्षकाला लाजवेल असेच शैक्षणिक क्षेत्रात काम केलेले आहे.शौचालय बांधा अन् पाचशे एक रुपये मिळवा हा एक अनोखा व स्वच्छतेच्या दृष्टीने महत्त्वाचा उपक्रम राबवून दिव्यांगांना आर्थिक मदत केलेली आहे.आष्टी शहरातील शासकीय कार्यालयांना संविधान दिनाचे औचित्य साधून संविधान प्रास्ताविकेच्या प्रतिमा भेट दिलेल्या आहेत.पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून जलमित्र म्हणून सहभागी गावांना भेटी देवून दिव्यांग असतांनाही श्रमदान करून स्वतःच्या दुचाकीवर पाण्याविषयी घोषवाक्य लिहून प्रचार व प्रसार केलेला आहे.सर्वधर्माची जपवणूक व्हावी या उद्देशाने रमजान या पवित्र महिन्यात दोन दिवसाचे रोजाचे उपवास करून दिव्यांगांना चांगले दिवस यावेत यासाठी दुवा मागितलेली आहे.तसेच दिव्यांग मतदारांच्या जनजागृतीसाठी निवडणूक आयोगाचे बीड जिल्हास्तरावरील राजदूत म्हणून काम करून स्वावलंबी मतदान केंद्र स्थापन करून एक आगळा - वेगळा उपक्रम राबविलेला आहे. अशा या शैक्षणिक,सामाजिक, साहित्यिक व राष्ट्रीय कार्यात स्वतःला वाहून घेणाऱ्या आदर्श शिक्षक राजेंद्र लाड यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा.

# कंधार येथे बी-बियाणे खरेदीसाठी शेतकऱ्यांची तोबा गर्दी


लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यात पावसाचे आगमन झाल्यामुळे शेतकऱ्यांना आता खरिपाच्या पेरणीचे वेध लागले,असून शुकवारी दिवसभर कंधार बाजारपेठे मध्ये शेतकऱ्यांनी बी - बियाणी खरेदीसाठी शेतकऱ्यांची तोबा गर्दी केल्याचे चित्र पाहावयास मिळाले.एकंदरीतच मागील दोन ते तीन दिवसांपासून तालुक्यातील बऱ्याच गावांमध्ये पावसाने थोड्याफार प्रमाणात पावसाने हजेरी लावली आहे,

थोड्याफार प्रमाणात पावसाने हजेरी लावल्यामुळे बळीराजाला आता आगामी दिवसांमध्येच शेतातील पेरणी करण्यासाठी बी-बियाणे खरेदीसाठी शेतकऱ्यांनी शहरातील कृषी दुकानाकडे धाव घेतली,असून शुक्रवारी बाजारपेठेमध्ये शेतकऱ्यांनी बऱ्याच प्रमाणात बी-बियाणे खरेदी केले आहे.

यावर्षी मोठ्या प्रमाणात तालुक्यामध्ये सोयाबीनच्या पेरणीमध्ये वाढ



होणार असल्याचे चित्र दिसून येत असून त्यासोबतच जूनच्या दुसऱ्या आठवड्यामध्ये पावसाचे आगमन झाल्यानंतर शेतकऱ्यांनी काही प्रमाणात मूग, उडीद या पिकांनाही प्राधान्य दिले,असल्याचे समजते तर तालुक्यात काही भागांमध्ये मन्याड नदीकाठच्या शेतकऱ्यांना मुबलक पाणी असल्यामुळे शेतकऱ्यांनी मे महिन्यातच कापसाची पूर्व हंगामी लागवड केली आहे. पूर्व हंगामी लागवड केलेल्या कापसाच्या पिकांना सध्या पाण्याची नितांत गरज असून हे पाणी काही प्रमाणात शेतकऱ्यांना बोरव्दारे तर काही शेतकऱ्यांना मन्याड,नदीपात्रातून कृषीपंपाद्वारे मिळाले आहे.दरम्यान आगामी चार ते पाच दिवसांमध्ये मराठवाड्यातील सर्वात भागांमध्ये मान्सूनचा पाऊस कोसळणार असल्याचे हवामान विभागाने अंदाज वर्तविल्यामुळे शेतकरी आता पेरणीसाठी सज्ज झाला असून शुक्रवारी दिवसभर कंधार तालुक्यातील बहादरपुरा,फुलवळ,आंबुलगा, शेकापुर,तळ्याचीवाडी,संगमवाडी,मुंढेवाडी,वाखरड या परिसरातील शेतकऱ्यांनी कंधार बाजारपेठे मध्ये बी बियाणे खरेदीसाठी गर्दी केली आहे.

### दोन कृषी सेवा केंद्राचा परवाना निलंबित;कृषी विभागाची धडक कारवाई

**कंधार तालुक्यातील कुरुळा येथील दोन कृषी सेवा केंद्राचा परवाना निलंबित करण्यात आला आहे,एमआरपी पेक्षा जादा दराने बि-बियाणे विक्री केल्याचे निष्पन्न झाल्याने ही कारवाई तालुका कृषी अधिकारी विठ्ठल गित्ते व पंचायत समितीचे कृषी अधिकारी गणेश यादव यांच्या संयुक्त पथकाने कारवाई केली,**

या दरम्यान बाजारपेठेमध्ये काही व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना वेटीस धरण्याचा प्रकार सुरू केला असून कपाशीच्या बॅगावर अधिकचे पैसे शेतकऱ्यांकडून घेतले जात आहेत. याकडे तालुका कृषी कार्यालयातील कृषी अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे असे शेतकरी वर्गातून बोलले जात आहे.

# वृक्षारोप देऊन पांडुरंग खवळे यांचा वाढदिवस साजरा



लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी तालुक्यातील श्री पांडुरंग खवळे (शोषित विकास प्रतिष्ठान आष्टीचे संस्थापक अध्यक्ष) यांच्या वाढदिवसानिमित्त पुरोगामी पत्रकार संघ तालुका अध्यक्ष अण्णासाहेब साबळे यांच्या वतीने वृक्षरोप देऊन वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देऊन ''झाडे लावा झाडे जगवा'' हा मोलाचा संदेश देण्यात आला.यावेळी शोषित विकास संघटनेचे तालुका अध्यक्ष भगवानराव भोसले,प्रबोधनकार कवीवर्य महादेव लांडगे, सामाजिक कार्यकर्ते सोपानराव जोगदंड,युवा नेते संदिप वाल्हेकर,पत्रकार सलिम पठाण,देसूर येथील माजी सरपंच महादेव कांबळे,ग्रा.स.लहु भवर,अशोक बावने,सामाजिक कार्यकर्ते सचीन पवार,शिवाजी वाल्हेकर आदी उपस्थित होते.

# महेश नवमी निमित् ५३ नागरिकांनी केले रक्तदान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

महेश नवमी निमित्त आज रक्तदान दिवसाचे औचित्त साधत घेतलेल्या रक्तदान शिबिरात५३ नागरिकांनी रक्त दान केले आहे.रक्तदान शिबिरा ला प्रदेश माहेश्वरी संघटने चे वरिष्ठ उपाध्यक्ष कमल माहेश्वरी, सारथी योजना के प्रदेश प्रभारी तथा पालक मंत्री बुलढाणा नरेश बियाणी,अनिल नावांदर ,जिला अध्यक्ष संजय सातल, राष्ट्रीय बधाई संयोजक विवेक मोहता, दिनेश गांधी, सुभाष मंत्री,जिला उपाध्यक्ष भुतडा, पप्पू राठी ,यांनी भेट दिली ,शिबीर यशस्वी करण्या साठी रुपेश मुंदडा, मयूर तोष्णीवाल, संजय काबरा,सौरभ तोष्णीवाल, मुकुंद बाहेती, लाला गांधी ,आनंद तोष्णीवाल ,श्रीनिवास मुंदडा , विजय तोष्णीवाल, डॉ राजेश मुंदडा,पंकज सारडा,राजेश



काबरा,बद्रीनारायन बाहेती, ओम बियाणी,केला सर,आशिष तापडीया, आदींनी अथक परिश्रम केले यासाठी डॉ राजेश मुंदडा यांच्या कर्मचाऱ्यांनी सुद्धा साथ दिली, यासाठी जीवनधारा बुलढाणा अर्बन रक्त पेढी यांना देण्यात आले त्या साठी महेश भकड व त्यांच्या पूर्ण स्टाफ होता

१५ जुनला माहेश्वरी समाजाच्या वतीने भगवान महेश चे अभिषेक , सायंकाळी पाच वाजता सजीव देखावे सह भव्य शोभा यात्रा सुरवात श्री मंगल कार्यालय येथून हिरडव चौक लोणी रोड श्री टॉकीज मार्गे परत श्री मंगल कार्यालय ,तेथे समाजच्या वतीने कार्यक्रम होईल,

# कंधार शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी भाजपचा घागर मोर्चा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार शहरांमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिक हैराण झाले आहेत तर महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, यामुळे भारतीय जनता पार्टीच्या कंधारच्या वतीने कंधार नगरपालिके वर घागर मोर्चा काढून निवेदन देण्यात आले यावेळी निषेध करत ड गंगाप्रसाद यन्नावार यांनी नगरपालिकेमध्ये प्रतिकात्मक आंघोळ करत नगरपालिकेचा निषेध केला.

कंधार तालुक्यात मुबलक पाणीसाठा उपलब्ध असून एका बाजूस जगतुंग समुद्र व दुसऱ्या बाजूस मन्यानदी आहे,शहरासाठी पाणीपुरवठा करन्या करिता २६ कोटी रुपयांची लिंबोटी धरणातून कायम स्वरूपी पाणीपुरवठा करण्यासाठी उपाय योजना करण्यात आली होती.ती अद्यापही अपूर्ण अपूर्ण आहे नगरपालिकेच्या गलथन कारभारामुळे व नियोजनाच्या अभावामुळे वारंवार पाणीपुरवठा हा



विस्कळीत होत आहे, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे,तर महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, अशा नगरपालिका प्रशासनाच्या गलथान कारभाराचा आम्ही निषेध करत नगरपालिका प्रशासनास दि,१४ जुन रोजी निवेदन देण्यात आले,

या निवेदनात नगरपालिका प्रशासनाने तात्काळ कंधार शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करावा अन्यथा भारतीय जनता पार्टीच्या कंधार च्या वतीने नगरपालिका प्रशासनाच्या विरोधात घागर मोर्चा काढून तीव्र आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.यावेळी ड गंगाप्रसाद यन्नावार, मधुकर पाटील डांगे,निलेश गौर सतीश कांबळे ड सागर डोंगरजकर,संतोष पदमवार,बालाजी दासू पवार,महंमद फारूक,अविनाश गित्ते,रामदास बाबळे, हनमंत डुमणे,चंदनफुले दत्तात्रय,शेखर वडजकर, रवी संगेवार,शुभम संगणवार, यांच्यासह भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# नांदेड येथे माजी राज्यमंत्री,डी. पी.सावंत यांचा राज्य परिवहन महामंडळ प्रवाशी संघटनेच्या वतीने सत्कार संपन्न

## बसस्थानकचे स्थलांतर करून रेल्वे स्थानक ते बसस्थानक रस्ता बनवणार-मा.राज्यमंत्री डी.पी.सावंत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । भारत वानरे**

राज्य परिवहन महामंडळ विश्वासू प्रवासी संघटनेच्या वतीने माजी राज्यमंत्री डी .पी.सावंत याचा सत्कार करण्यात आला आणि त्यांनी नांदेड येथील मुख्य बस स्थानकाला धावती भेट दिली,व प्रवाशांना त्याच्या हस्ते फळ वाटप करण्यात आले . त्यावेळेस विश्वासू प्रवासी संघटनेच्या वतीने त्यांना रेल्वे स्टेशन ते बस स्थानक पर्यंत रस्ता हा प्रलंबित असून त्यासाठी आपण पाठपुरावा करावा असे संघटनेने त्यांना विनंती केली असता त्यांनी सदरील यंत्रणेला पाठपुरावा करून हे काम करण्याचे आदेश दिले आहेत.तसेच बसस्थानक स्थलातर करून या कामाची सुरुवात लवकरच होणार असल्याची ग्वाही दिली व काम लवकरच सुरु होत आहे म्हणून माजी राज्य मंत्री डी .पी.सावंत यांचा सत्कार करतेवेळी विश्वासू प्रवाशी संघटनेचे अध्यक्ष शंकरराव नांदेडकर ,उपाध्यक्ष कृष्णा उमरीकर ,सहसचिव रमाकांत घोणसीकर ,भारत वानरे व तसेच इतर मान्यवरांनी साहेबाचे अभिनंदन आणि सत्कार करून त्याचे आभार मानले.



# माजी मुख्याध्यापक श्री पी एल उर्फ पोचीराम लालबा मनुरे गुरुजी याचं निधन

लोकनेता न्यूज नेटवर्क

मनुरे परिवाराचे आधारवड माजी मुख्याध्यापक श्री पोचीराम लालबा मनुरे गुरुजी यांना दिनांक १४/०६/ २०२४ रोजी रात्री ९:३० वाजता त्यांना देवाज्ञा झाली. ते ८५ वर्षाचे होते, अतिशय संघर्ष आणि कष्टातून त्यांनी आपला संसार फुलवला होता,

त्यांची मुले पुतणे नातू नातवंडे हे सर्व उच्चशिक्षित कुटुंब त्यांनी घडवलेला होता.

लहानपणापासून जिद्द आणि कष्टाच्या बळावर त्यांनी मुख्याध्यापक पदापर्यंत खूप मोठी सेवा केली, निवृत्तीनंतर ते अध्यात्म मार्गाकडे वळले होते. अतिशय मनमिळावू शांत,सदाचारी,



असलेले गुरुजी परिवारासोबतच समाजातील त्यांचे सामाजिक कार्यात देखील महत्त्वपूर्ण योगदान होते

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904